श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर

**<u>गोशाळेतील शेणखताचा जाहीर लिलाव.</u>**

समितीच्या गोशाळेतील शेणखताचा लिलाव करणेत येत आहे. तरी ज्यांना लिलावात भाग घ्यावयाचा आहे, त्यांनी दि. ३१/१२/२०१६ रोजी सायं. ५.०० वाजेपर्यंत विहित नमुन्यातील अर्ज व अनामत रक्कम रू.१०,०००/— डी.डी./रोख स्वरुपात संत तुकाराम भवन येथे भरणे आवश्यक आहे. या संबंधीची माहिती, अटी, शर्ती व लिलाव फॉर्म संत तुकाराम भवन, पंढरपूर येथे आणि www.vitthalrukminimandir.org या वेबसाईटवर उपलब्ध आहेत.

क्र.गोशाळा/का.वि./ ११९/२०१६ दि. २०/१२/२०१६

सही xxx

कार्यकारी अधिकारी

(संपर्क क्र. ०२१८६—२२३५५०, ९९७५८१४९३५)

**श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर**

गोशाळेतील शेणखताचा जाहीर लिलाव.

**माहिती, अटी व शर्ती खालीलप्रमाणे.....**

१. नमूना लिलाव फॉर्म कार्यालयीन वेळेत तुकाराम भवन येथे उपलब्ध होवून मिळतील. तसेच www.vitthalrukminimandir.org या वेबसाईटवर मिळतील. लिलाव फॉर्म भरून दि.३१/१२/२०१६ सायं. ५.००वा. पर्यंत तुकाराम भवन, पंढरपूर येथे दाखल करणे आवश्यक आहे. लिलाव फॉर्म समक्ष तुकाराम भवन येथे सादर करावेत किंवा रजिस्टर पोस्टाने पाठवावे. उशीरा आलेले फॉर्म विचारात घेतले जाणार नाहीत.

२. लिलाव फॉर्म सोबत अनामत रक्कम रू.१०,०००/— चा कार्यकारी अधिकारी, श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांच्या नावाचा डी.डी. सादर करणे आवश्यक आहे. लिलाव फॉर्म व अनामत रकमेचा डि.डी. सिलबंद पाकिटात दि.३१/१२/२०१६ रोजी सायं. ५.०० वाजेपर्यंत सादर करणे आवश्यक राहील. **सिलबंद पाकिटावर ठेकेदाराचे पूर्ण नाव, पत्ता, मोबाईल कं. व शेणखत लिलाव फॉर्म असे नमुद करणे आवश्यक आहे.** सिलबंद लिलाव फॉर्म दि.०२/०१/२०१७ रोजी सं.१२.३० वा. संत तुकाराम भवन येथे सर्व ठेकेदारांच्या समक्ष उघडण्यात येतील. ज्या ठेकेदारांना त्यावेळी इतर ठेकेदाराने नमुद केलेल्या दरांपेक्षा जास्त दराने बोली बोलावयाची असल्यास तशी संधी त्यावेळी देण्यात येईल. ज्या ठेकेदाराने जास्तीत जास्त दर नमुद केला असेल किंवा जास्तीतजास्त दर बोलला असेल त्याच्या नावे लिलाव मंजुर करण्यात येईल.

**३. शेणखत लिलावाची किमान बोली रू.७५,०००/— राहील.**

४. ज्याचे नावे लिलाव मंजुर होईल त्यांनी लिलावाची होणारी २५% रक्कम त्याच दिवशी भरणा केली पाहिजे आणि उर्वरीत ७५% रक्कम पुढील पंधरा दिवसात भरून माल उचलणे आवश्यक आहे.

५. मुदतीत रक्कम भरली नाही अथवा माल उचलला नाही तर सदरचा लिलाव रद्द केला जाईल व अनामत रक्कम व २५% रक्कम जप्त करण्यात येईल.

६. शेणखत गोशाळा, यमाई तलावाजवळ, गणेश नगर, पंढरपूर या ठिकाणी दि.२०/१२/२०१६ ते दि. ३१/१२/२०१६ या कालावधीत कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल.

७. सदरचे साहित्य लिलाव धारकांने स्वत:चे मजुर व वाहन लावून मंदिर समितीचे प्रतिनिधी समोर उचलणेचे आहे.

८. नमुन्यातील अर्जासोबत ओळखीचा पूरावा म्हणून निवडणूक ओळखपत्र/आधारकार्ड/ड्रायव्हींग लायसंन्स/राष्ट्रीय बॅंकेचे पासबुक/पॅनकार्ड यापैकी एकाची झेरॉक्स प्रत जोडणे आवश्यक आहे. तसेच लिलावाचे वेळी मुळ ओळखपत्र आणणे आवश्यक आहे.

९. रहिवासाच्या पुराव्यासाठी स्वत:चे नावचे लाईट बील किंवा फोन बीलाची एक प्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

१०. प्रशासकीय व अन्य कारणास्तव लिलाव प्रक्रिया कोणत्याही स्तरावर रद्द करण्याचा अधिकार मंदिर समितीने राखुन ठेवलेला आहे.

११. सदर कामासंबंधी काही वाद उद्‌भल्यास त्यासाठी न्यायालयीन कार्यक्षेत्र पंढरपूर हे राहील.

——————‘‘———————

**श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर**

गोशाळेतील शेणखताच्या जाहीर लिलावात सहभागी होणेसाठी अर्ज.

दिनांक /१२/२०१६

प्रति,

मा.कार्यकारी अधिकारी,
श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती,
पंढरपूर.

विषयः— शेणखत जाहीर लिलाव.

अर्जदाराचे पूर्ण नाव :— ——————————————————————

पूर्ण पत्ता :— ——————————————————————

——————————————————————

मोबाईल कं.:— ——————————————————————

महोदय,

वरील विषयात नमूद केले प्रमाणे विनंती अर्ज करतो की, आपलेकडील दिनांक २१/१२/२०१६ रोजीचे दै. पुण्यनगरी, सोलापूर वर्तमानपत्रातील समितीच्या गोशाळेतील शेणखताच्या जाहीर लिलावाची जाहिरात वाचली असून मला सदर लिलावात सहभाग घेण्याची इच्छा आहे. त्यासाठी अनामत रक्कम रू.१०,०००/— रोखीने / डी.डी. ने भरलेली आहे. सदरच्या लिलावाबाबतच्या मंदिरे समितीच्या सर्व अटी, शर्ती व सूचना (वेबसाईट वरील आणि अर्जासोबत दिलेल्या) मला मान्य आहेत व त्याचे मी तंतोतंत पालन करीन.

१. अनामत रक्कम डिमांड ड्राफ्टने दिली असल्यास बॅकेचे नांव, डी.डी. कमांक व दिनांक (सोबत डि.डि जोडला आहे.)
   ————————————————————————————————

२. अनामत रक्कम रोख भरली असल्यास पावती कमांक व दिनांक (सोबत पावतीची झेरॉक्स प्रत जोडली आहे.)
   ————————————————————————————————

३. सोबत ओळखीचा पूरावा म्हणून ————————————ची झेरॉक्स प्रत जोडली आहे.

४. सोबत रहिवासाचा पूरावा म्हणून ————————————ची झेरॉक्स प्रत जोडली आहे.

२/— शेणखत खरेदीचा माझा दर मी खालीलप्रमाणे नमुद करीत आहे.

| अ. क्र. | मालाचा तपशिल | किमान बोलीची किंमत (रू.) | ठेकेदाराने खरेदीसाठी नमुद केलेली जास्तीतजास्त किंमत (रू.) |
|---|---|---|---|
| १ | शेणखत | ७५,०००/— | |

सदरच्या मी नमुद केलेल्या दराने शेणखत खरेदी करण्यास बांधील राहील.

आपला विश्वासू,

(नाव व सही)